ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 5 | JANUARY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ऐतेहासीक पर्यटनाचा बीड जिल्हा

**प्रा. डॉ. लदाफ शफी खाजामैनोद्दीन**
**इतिहास विभाग , आझाद महाविद्यालय,औसा , जि. लातूर .**



**प्रस्तावना :-**

बीड जिल्हा म्हणजे विराट संस्कृतीय माहेरघरच आहे. या जिल्ह्याचा इतिहास वैदीय काळापासून ज्ञात आहे. वेद आणि पुराणात त्याचा उल्लेख 'अस्माक' असा केलेला असून पाडव काळात त्याला चंपावती असे संबोधले जात असत. उज्जैनच्या राजांची साडेसाती त्याच ठिकानी संपली ; त्यावेळी बीडला 'तामलिंगचूर' या नावाने ओळखत जाई असे शनि महात्म्यामध्ये वर्णन केले आहे. आध्र चालुक्य राष्ट्रकुट, आणि यादवांनी त्यावर राज्य केले फारशी भाषेत 'भीर' या शब्दाचा पाणी असा होतो त्याचा अपभ्रंश होऊन बीड हे नाव मोगल काळात रुढ झाले.[1]

महराष्ट्र राज्याच्या औरंगाबाद महसूल विभागामध्ये केन्द्रस्थानी असलेला बीड जिल्हा हा उत्तर अक्षांश 18.3 ते 19.3 अक्षांशामध्ये आणि 74.5 ते 76.5 पूर्व रेखांशामध्ये वसलेला आहे. धुळे सोलापूर या राष्ट्रीय महामार्ग क्र 211 वर बीड शहर असून बीड जिल्हांच्या उत्तरेस औरंगाबाद आणि जालना हे जिल्हे वायव्य पश्चिम आणि नैत्रय्य बाजूस अहमदनगर जिल्हा दक्षिणेस बाजूस अहमदनगर जिल्हा आणि उस्मानाबाद व आगणेय पूर्व आणि इशानयेस लातूर आणि परभणी हे जिल्हे आहेत बीड शहराला रेल्वे जोडलेली नाही मात्र बीड जिल्ह्यातील परळी हे रेल्वे स्थानक आहे ते मात्र बीड पासुन 90 कि.मी. अंतरावर आहे. मुंबई पासुन रस्ता मार्गने बीडचे अंतर 401 कि.मी. आहे.
जिल्ह्याचे प्रमुख प्रर्यटनाविषयी माहिती खालील प्रमाणे आहे.

**परळी वैजीनाथ :- वैद्यनाथ ज्योतिलींग :-**

पर्यली म्हणजे परळी. असुन कलयुगात पर्यली किंवा परळी या नावाने हे स्थान ओळखले जाते. तर कृतयुगात जयंतीश्रेत्र वैजयंती श्रेत्र, द्वापार, युगात मध्यरेखा, किंवा क्रांतीपुरोक्षेत्र या नावाने ओळखले जाते. द्वापार युगात मध्यरेखा श्रेत्र सिध्द करताताना भास्कराचार्यांनी कलयुगातील पर्यली नावाचा वापर केला आहे. या ग्रंथाच्या मालीकेतील तिसऱ्या भागात म्हटले आहे की, पंजाब व गुजरातेतही वैद्यनाथाची मंदीरे आहेत मात्र शिवपुराणांच्या ब्रहम्पुराण उपभागात प्रतिष्ठान (पैठन) गंगाखेडसह परळीचा उल्लेख आहे. त्यामुळे ज्योतिलिंगाच्या स्थान निश्चितीस मदत झाली. तर मुह ज्योतिलिंग स्त्रोतातही परल्या वैजनाथ हा उल्लेख सापडतो, परळी ही प्राचीन नगरी आहे. यांचे सुबळ पुरावे सापडतात. विशेष राष्ट्रकुटांच्या काळात या नगरीला मोठे महत्त्व होते. राष्ट्रकुट राजा तिसरा रुद्र याचा परळीत सापडलेला तांम्रपट राष्ट्रकुटकालीन परळीचे महत्त्व अधोरेखीत करतो. परळी वैजीनाथ येथे उपलब्ध झालेल्या या राष्ट्रकुट कालीन तांम्रपट अनेक अर्थाने उल्लेखनीय ठरतो.[2]

भारतातील स्वयंभु बारा ज्योतीलिंगापैकी वैद्यनाथ हे ज्योतिलिंग परळी शहरात आहे. हे मंदीर देवगिरीच्या यादवांचया श्रीकरणाधिप हेमाद्री यांनी बांधले. या मंदिराच्या अवशेषापैकी फक्त नंदी सुस्थितीत राहिलेला होता. पुढे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी मंदिराचा जोणोद्वार केला गुढी पाडव्याच्या दिवशी वैजनाथांच्या मंदिरात गुढी उभारण्याचा समारंभ असतो. श्रावण महिण्यात येथे रुद्रभिषेक चालतो दसऱ्याच्या दिवशी देवाची पालखीतून मिरवणुक निघते

मंदिराचया सभामंडपात एक पतळी व दोन पाषांनी अशा नंदीचया तीन मुर्ती आहेत. येथे विरभ्रदाची एक भवय पितळी प्रतिमा आहे. मंडपाशिवाय मंदीरात दोन गाभारे असून त्यांचे दरवाजे कलात्म्क नक्षीने सजवलेले आहेत. मुख्य ज्योतिलिंगाच्या भोवती बारा लिंग आहेत.[3]

### धारुरचा भुईकोट ऐतिहासीक किल्ला :-

बहमनीकाळात मात्र धारुरला अण्यसाधाराण महत्तव प्राप्त झाले होते. बहमणी वंशाची शकले उडुन निर्मान झालेल्या निजामशाही अदिलशाही, कुतुबशाही, इमादशाही, व बरीदशाही या सत्तापैकी अदिलशाहीचे लक्ष सर्व प्रथम धारुरकडे वळले. अदिलशाहचा सेनापती किश्वखाँन लॉरीने पहिला अली अदिलशाहा इ.स. 1558 ते 1580 च्या आदेशान्वे , प्राचीन महादुर्गाच्या ठिकाणी 8 जुलै 1567 ते 26 जुन 1568 या काळात धारुरचा विशाल किल्ला उभारुन पुढील तब्बल चार सर्व सत्तांना धारुरला राजकिय द्रुष्ट्या महत्तव द्यायला भाग पाडले. धारुरच्या किल्याने नेताजीपालकरांच्या अवळ्या गेलेल्या व ज्रमुळीची अगतिक्ता पाहिली जीजाऊची आळवणी पाहिल्या, विठोजीराजे भोसल्यांचा सहवास अनुभवला आणि अनेक सत्तांचे ध्वज उतरताना चढताना पाहिले.[4]

मध्ययुगीन दुर्गस्थापत्यशैली आणि विशिष्ट भूभागास लाभलेली नैसर्गिक वरदान यांचा संगम आल्यास तो उत्कृष्ट दुर्ग उभा राहील यांचे उदाहरण म्हणजे धारुरचा किल्ला होय प्रथमदर्शनी भुईकोट वाटणारा किल्ला गढकोट आहे. तत्कालीन जलव्यवस्थापनाचा उत्कृष्ट उदाहरण या किल्यात पाहायला मिळतो. किल्ल्यांचया तीनही बाजुंना खोलदरी आहे. किल्ला भोईकोट वाहटत असला तरी तस एका खंदकातून जावे लागते. खंदक प्रचंड खोल आहे. खंदकाचे दोन भाग पडता. एका खारी दिंडी तर दुसऱ्यास गोंड दिंडी म्हण्तात कारण एकाचे पाणी खारे तर दुसऱ्याचे गोड लागते हा भौगोलिक चमत्कार म्हणावा लागेल खंदक लोलांडुन आत गेल्यावर 3.50x8 मी.चे पहिले प्रवेश द्वार लागते या बुरुजांच्या आतुन पुढे गेले कि दक्षिणेस 10.20x3.8 मी. ची एक दुसरे प्रवेश द्वर लागते. तसेच गोमुखी प्रवेश द्वारे 42 मि. रुंद 4.5 मिटर खोल खंदक, तब्बल 132 ते 165 फुट उंच त्रिकोणी आकाराचा 6 फुट उंच चर्या 10 फुट रुंद कांजी एकच वेळी तीन दिशांना मारा करण्याची व्यवस्था आणाऱ्या तिरप्या भुमिकेकडे तोड असणाऱ्या जंग्या व तब्ब्ल 30 बुरुशांनी वेढलेला धारण्या किल्ला विविध वैशिष्ट्यांनी नटलेला आहे. किल्ल्याच्या प्रवेश द्वाराच्या पश्चिमेस खंदकाला लागुन असणाऱ्या विशाल अशा बुरुजांवर शिलालेख असुन तो अरबी, फारसी देवगीरी या तीन भाषेत आहेत, विशेषत: किल्यावर असा शिलालेख अपवादानेच सापडतो. जवळपास 35 एकर श्रेत्र फळात पसरलेला हा किल्ला समुद्र सपाटीपासुन 2472 फुट उंच आहे. तर सर्वात उंच असणाऱ्या टेहाळणी बुरुजांची उंची 120 फुट आहे. 'वाकियाते विजापूर' या ग्रंथात या किल्याला 21 बुरुज असल्याचे म्हटले आहे. यातील पश्चिमेकडील बुरुजांकडे लोटा साठी वापरतात किल्यातील शाहबुरुश सर्वात महत्त्वाचा बुरु असुन तो प्रामुख्याने वापरला जात असत

धारुरच्या किल्यात विविध वैशिष्ट्यपुर्ण इमारती सापडतात त्यात टकसाळ हि महत्त्वाची इमारत असुन मुघलांनी किल्ला ताब्यात घेतल्या नंतर सम्राट शाहजहानच्या काळात येथे चलनी नाणी तयार करणारी टाकसाळ केली गेली होती. मुघल सम्राट फरुकसिअल यांचे धारुरच्या टाकसाळीत तयार केलेले नाणे मिळाले आहे. ती टाकसाळ 60 फुट लांब व 40 फुट रुंद आणि 36 फुट उंच आहे. या शिवाय रंगमहलात शाही स्नानग्रह शाहीबाग, हवामहेल, कारंजे, दुमजली इमारत, मस्जीद, मौलवीचे निवास्थान, कैदखाना, वधस्तंभ, अंबरखाना, शस्त्रगार, हजरत सय्यद सादात साहबांचा दर्गा, शस्त्रगार सरदारांची निवास्थाने टकसाळ, दारु कोठारे तेल आणि तुपाचा हौद, पाणीपुरवठा चोर दरवाजे, बाजारपेठ, भुयारी मार्ग, जलतण तलाव, व दफ्तरखाना, या सारख्या अनेक इमारतीचे अवषेश गतकाळातील वैभवाच्या साक्षीदार म्हणुन उभे आहेत.[6]

### अंबाजागाईची योगेश्वरी माता :-

इतिहासाच्या मध्ययुगात अंबाजोगाई शहर बीड जिल्ह्याचे सामाजिक राजकिय व सांस्कृतीक केंद्र म्हणुन मोठे महत्त्व आहे.

योगेश्वरी मंदरी नगरातील प्राचीन स्थळ वाटते. महामंडलेश्वर उदयदित्य (शके 1066) च्या भूचरनाथ (हत्तीखाना) शिलालेखात अंबेचा दीप व योजीनीदेवी असा उल्लेख आहे. तो योगेश्वरी बद्दलचा असावा. नंतर या दव काळात खोलेश्वराने या मंदिरास दान दिल्याचा शिलालेख आढळतो.[7]

महाराष्ट्रामध्ये देवाचे मुख्य पीठ आणि अनेक उपपीठे असली तर अंबेच्या नावाने प्रसिध्द असलेले अंबाजोगाई हे एकच शक्तीपीठ अस्तीत्वात आहे योगेश्वरी ही सर्वांचीच देवता असली तरी विशेष : कोकनातील चित्तपावन ब्राम्हणांची ही

कुलस्वामीनी आहे. योगेश्वरी महामात्य या ग्रंथात देवानी दंतासुराचा वध करण्यासाठी अवतार घेतलची कथा मांडली आहे. बीउ पासून 100 कि.मी.अंतरावर असलेले अंबाजोगाई शहरात मंदिराच्यावतीने भावीकांसाठी व्यवस्था करण्यात आली आहे.[8]

मराठीचे आद्यकवी मूकंदराज :- मराठी भाषेचे आद्य कवी मुकंदराज जन्म शके. 1050 च्या काळात देवगिरीच्या यादवांच्या काळात झाला. आणि या काळात भिल्मदेव यादवाने देवगिरीला स्वतंत्र सत्तेचा दर्जा घोषीत करुन स्वतः त्यास राजा घोषीतकेले. त्याच्या मृत्यु नंतर त्याचा मुलगा जैत्रपाल राजा झाला याच राजा जैत्रपालास मुंकंद राजानी जीवनउपदेश दिला. हा जीवनोउपदेश म्हणजे मराठीची अद्य कविता विवेकसिंधु होय दुष्काळ पडला होता जैत्रपालाने अनेक साधूंना तळे खोदायला लावले पण अपयश आले. तेव्हां मंकुंदराजाच्या उपदेशाने हे काम फते झाले. क्षणात ब्रम्ह्रा दाखविण्याचेही अश्यक्य अध्यात्वीक कार्य मुंकुंदराजांनी केल्यानेत राजा जैत्रपालानी त्यांना आपले अध्यात्मिक गुरु मानले.[9]

अंबाजोगाईशहराचया नैत्र्यत्य दिशेने तीन कि.मी. अंतरावर बालाघाटच्या उंच डोगरामधुन वाहणाऱ्या वाहनगंगा (पेनगंगा) या प्राचीन नदीचया काठावरील निसर्गरम्य परिसरात मुंकंदराजांनी मराठीची अद्य कविता लिहली मुंकंदराजाच्या स्थळ काल परंपरे विषयीची प्राचीन साहित्याच्या अभ्यासकांनी मोठ्या प्रमानात भरीव चर्चा केली आहे. त्यातुनच मुंकदराजांचया स्थलकाला विषयीचा वाद मराठी साहित्यात चांगलाच गाजला.मात्र मराठवाड्यातील जेष्ठ इतिहास तज्ञ तात्या साहेब कोनाले यांनी मनोहर अंबानगरी या पुस्तकातून मुंकंदराज्यांची अंबाजोगाई म्हणजे मराठवाड्याचया बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्थल असल्याचे प्रमाण सिध्द केल्याने या वादावर पडदा पडला. मुकंदराजचा विवेक सिंधु (1190) हा काव्य ग्रंथ मराठी अद्य कविता मानली जाते. या शिवाय परमावृत पवनविजय, मुलस्तंभ पंचीकरण, यासारखे तत्वज्ञानावर आधारीत ग्रंथ लिहुन त्यांनी मराठी भाषेचा पाया भक्कम केला विविक सिंधु पुर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग असुन पुर्वार्धात 777 तर उत्तरार्धात 894 ओव्या आहेत. स्वतःच्या बौध्दीक क्षमतेने वदांचे तत्त्वज्ञान सांगणारा पहिला तत्त्ववेता म्हणुन मुंकंदराजकडे पाहिले जाते. मुकंदराज केवळ संस्कृतीचे महान विदवानच होते असे नाही तर आपल ज्ञानाने वास्तवतेची प्रचिती देण्याची त्यांच्या जवळ नैसर्गिक अदभूत शक्ती होती. मराठी भाषेची भक्क्म मुहूर्तमेढ रोवणाऱ्या या आद्य कविचा शके 1120 इ.स. 1128 मध्ये मृत्युझाला मराठीचीपहिली कविता लिहल्यामुळे नव्हे तर वेदांना अवघड भाषेत सांगण्याचा प्रघात असणाऱ्या काळात वेदनांना जन्मबोली सांगण्याचं कार्य मुकुंदराज यांनी केले. आज अंबाजोगाई शहराच्या वायुव्य दिशेस पाच किलोमिटर अंतरावर मुकुंदराजाची समाधी आहे.[10]

### संतकवी दासोपंत :-

दासोपंत मुळचे कर्नाटकाच्या बिदर जिल्ह्यातील नारायणपेठचे त्यांचा जन्म शके 1473 मध्ये झाला, हा काळ बहमणी राजवटीचा होता दासोपंतांनी बिदर सोडले परळी मार्ग अंबाजोगाईत आले प्रारंभी सिध्दोपंत देशपांडेकडे थांबले, नंतर निसर्गरम्य परिसरातील नृसिह मंदिरात त्यांनी ध्यानधारणा केली. त्यांची समाधी स्थळ ही येथेच आहे. दासोपंत पंधराव्या शतकातले एक महान कवी होते. ते उत्कृष्ठ चित्रकार आणि संगितकारही होते. त्यांचा दासोपंत पासोडीचा सुक्ष्म अभ्यास केला तर त्यांच्या व्यक्ती महत्त्वाची वेशिष्ट्ये अगदी ठळक जानवतात. संस्कृत कानडी हिंदी आणि मराठी भाषेवर त्यांचे प्रभूत्व होते. त्यांच्या मराठी साहित्यात या भाषेमधील अनेक शब्द सापडतात. त्यांच्या दासोपंत पासोडीने पंधराव्या शतकातल्या काव्यलेखन शैलीत क्रॉती केली होती. पण त्यांचे अन्यग्रंथ ही तितक्याच ताकदीचे आहेत. त्यात, चंर्द्रिका ग्रंथराज उपनिषेद प्रबोध्दोय, पदार्ण, चांद्रिका दत्तात्र्य, महाकाव्य हे ग्रंथ उल्लेखनिय आहेत. यासाठी पंचीकरणातून दासोपंत अत्यंत उत्तम चित्रकार होते हेच स्पष्ट होते. पासोडी. 12.19 मि. म्हणजेच 40 फुट लांब असुन 1.21 मिटर म्हणजे 4 फुट रुंद आहे. यात दासोपंतानी पंचीकरण वेदाचे अतिसुक्ष्म वर्णन केले आहे. तेरा भागात विभागलेलया या पासोडीवर लालशाहीने खुणा करुन विभागांना निर्देश केले गेले आहे. चित्राद्वारे स्पष्टीकरण करण्याचे उत्तम उदाहरण म्हणजे पासोडे होय पंचीकरण वेदांचे सुक्ष्मपणे वर्णन करणारे एकमात्र उपलब्ध साहित्य म्हणजे पंचीकरण पासोडी हाये.[11]

### कपिलधार :-

वीरशैव पंथाचे पुनर्जिवन करणारे महात्मा बस्वेश्वर तसेच शिवयोगी मन्मथ स्वामी यांनी कपिलधार या ठिकाणी अनेक वर्ष तपश्चर्या केली. नयनरम्य डोंगरदऱ्यांचा हा प्रवेश असुन याच ठिकाणी संख्या शास्त्रकार कपील महामुनीनी तपश्चर्य केली होती. म्हणुन या भागास कपिलधार असे म्हणता. येथील धबधबा मनमोहक आहे. कपिलधार हे तीर्थक्षेत्र बीड शहरांपासून साधारण 20 कि.मी. अंतरावर आहे.[12]

**कनकालेश्वर मंदीर :-**

बीड शहराच्या मध्यभागातुन वाहणाऱ्या बिंदुसरा नदीच्या पूर्वकाठावरले देखणे कनकालेश्वर मंदीर म्हणजे चालुक्याच्या सौदर्यष्टीचा सुवर्गसुंदर नमुना होय.

महराष्ट्रातील सुवर्गसुंदर जलमंदिर म्हणुंन अभ्यासक या मंदीराकडे पाहतात. कंकालेश्वर मंदिराच्या नामकरणा विषची अनेक प्रवाह आहेत. कनक म्हणजे सोने. सोने प्रमाणे हे मंदरी चमकते म्हणुन मंदीराचे नाव कंकालेश्वर पडले असे हि म्हणटले जाते. मंदीरा सर्व बाजुनी पाणी आणि आत शिवालय आहे. पाण्यात देऊळ पण मजबूत आणि भव्य दिव्य असुन मंदिरात आणि बाहेरचे कोरीव देवदेवतांचे विविध प्रकारचे शिल्प अगदी प्रेक्षणीय आणि डोळ्याचे पारण फेडणारे आहे. हे मंदिर बीडचे ग्रामदैवत असल्यान इथ दरवर्षी महाश्विरात्रीला फार मोठी यात्रा भरते याच मंदिराच्या पुर्वेस पुन्यश्लोक अहिल्याबाई होळकरांनी बांधलेले खंडेश्वरी देवीचे मंदरी आहे. हे मंदिर म्हणजे शहराच भुषणच. [13]

**खजीना बावडी (विहीर) :-**

बीड शहराच्या पश्चिमेस पाली रोडवर बीड पासुन 6 कि.मी. अंतरावर अहमदनगरच्या निजामशाहीच्या काळखंडात मुर्तुजानिजाम शाह च्या काळात बांधलेल्या खजीना बावडीचे महत्त्व मध्ययुगीन जलसिंचनाच्या दृष्टीने अन्यसाधारण महत्त्व आहे, मुर्तुजा निजाशाहने त्यांच्या विश्वासातील कांही जनांची मंत्री म्हणुन नियुक्ती केली. व त्यांना जाहगिरी दिली. त्यात बीडची जाहगिरी सलाबतखानकडे आणली सलाबत खान हा मुर्तुजाच्या अत्यंत विश्वासातला मंत्री होता त्यांनी बांधलेले पक्के रस्ते वृक्षरोपन नगरीचे सुशोभीकरण आणि जलहितार्थ कामामुळे तो लोकप्रिय मंत्री ठरला सलाबत खान ने बीडचे सुत्रे हाती घेताच विविध विकास कामाचे नियोजन केले बिडच्या खऱ्या सुशोभीकरणाला सलाबतखानानेच सुरुवात केली त्याने प्रथम शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले. त्यासाठीच त्यांने शेतीला पाणी पुरवठा करण्याच्या मुख्य हेतूने 1852 मध्ये राजा भास्कर या वास्तु व भूजल शात्रज्ञानाच्या मदतीने बीउ जवळ खजीना बावडी (विहीर) बांधली बीड सुभ्याच्या विविध कामासाठी मुर्तुजाशाहकडुन आनलेला सगळा खजिना या एकाच विहीरीच्या उभारणीत खर्च झालयाने या विहीरीचे खजिना बावडी हे नाव पडले आहे.बीड शहराच्या नैत्रत्य दिशेस असणाऱ्या बलगुजार तरफेच्या शेतीसाठी जलसिंचन हाय या खजिना बावडीचा मुख्य हेतू होता. बलगुजार या भागाचे मुळ नाव फार्सी भाषेत बर्ग-ए-झार होय. बर्ग-ए-झार म्हणजे फुला पाणांनी बहरलेलेली भूमी. निजामशाहीच्या काळात सर्व सामान्य शेतकऱ्यांच्या शेतीसाठी जलसिंचनाच्या किती गांभीर्याने विचार केला होता या पूराव्याचा जणु कांही खजीना विहिर ठरली आहे. मध्ययुगातील जलसिंचन व्यवस्थेवर महत्त्वाचा प्रकाश टाकणारी खजिना बावडी अनेक आश्चर्य आपल्या गर्भात घेऊन उभी आहे. म्हणजे खजिना बावडी बांधल्याच्या दिवसापासुन ते आजपर्यंत ते आपली वैशिष्ट्ये टिकुन आहे. खजिना बावडी म्हणजे भूगर्भातील जलस्त्रोत शोधण्याचा तत्कालीन विज्ञानाचा ठोस पुराव ठरतो.

ही खजीना बावडी 23.5 फुट खोल असुन ती दोन टप्यात विभागली गेली आहे. जमिनीस्तरापासुन 17.3 फुटावर पहिला टप्पा असुन तेथे10.5 फुट रुंदीचा गोलाकार एक छान वरांडा आहे. त्यावर आपण वावरु शकतो या गोलाकार वरांड्यामध्ये मुळ विहिरीचा दुसरा ठप्पा असुन त्याची खोली 6.3 फुट आहे. ज्यात अनेक वर्षापासून 4 फुट पाणीआहे. या गोलाआकर विहीरीचा व्यास ही दोन टप्यात विभागला गेलय. विहीरीचा जमीनी स्तरावरील व्यास 18.152 मिटर असुनव्हरांड्या पासुन खाली दुसऱ्या टप्यांचा व्यास 12.361 मिटर आहे. जोया विहीरीचा मुळ व्यास म्हणायला हवा विहीरीला पुर्वी नमुद केल्या प्रमाणे उत्तर अग्नीय, नैरत्य, दिशाना 5 फुट उंच व 2.5 फुट रुंद बोगदे अर्थात नहरी आहेत. विहिरीत उतरण्यासाठी पश्चिमेकडुन दोन टप्यात पायऱ्या आहेत. पहिल्या टप्यात प्रारंभी मजवुत दगड 14, पायऱ्या असुन त्यात 7.10 फुट रुंद ,10 इंच उंच आहेत तर दुसऱ्या टप्यात व्हरांड्यानंतर तीन पायऱ्या असुन त्या थेट विहीरीत जातात.[14]

**केदारेश्वर मंदीर धर्मापूरी :-**

बीड जिल्ह्याच्या परिसरावर प्राचीन काळी चालुक्यांनी राज्य केले. यांचा सर्वांगीन सुंदर पुरावा म्हणजे धर्मापुरीचे केदारेश्वर शिव मंदीर होय अजिंठा वेरुळ वगळता इतिहासाच्या प्राचीन मध्ययुगीन काळखंडातील मराठवाड्या जी मोजकी कलात्मक मंदिरे आज आहेत त्यात धर्मापूरीचे शिवालय वरच्या क्रमाकांचेच म्हणावे लागेल केदारेश्वर मंदीरावरील शिल्प चालुक्यकालीन कलासंपन्न समाज जीवनाची साक्ष देतात. शिल्पांमधील प्राणबध्दता ऐवढे अप्रतिम आहेत की शिल्पांच्या विषयात भिन्नता असतानाही संपूर्ण शिल्प समुहामध्ये एक समान लयबध्दता जानवते. आपण मध्ययुगातल्या कलेचया अतिउच्च काळखंडाची जणु एक कविताच अनुभवत आहे. मंदिराचा बाह्य भाग पाशाण शिल्पकुंजानी विलक्षण शोभनिय केला आहे. विषणु, लक्ष्मी, शंकर पार्वती, गणेश नृसिंह देवतांचया शिल्पसह शुंगारिक व नृत्यरत रुपवितांची शिल्पे ही अजोड

आहेत त्यांची प्रमदा, चंचला, प्रथुला मदालासा, गजगामिनी अशा विविध रुपातील चित्तवेधक शिल्पे बघणाऱ्यांना चकीत केल्याशिवाय रहात नाही. देखना चेहरा घाटदार व ठसठसीत बांधेदार कामुक शरीर सृष्टी पुष्ट डोलदार वृक्ष त्यावर मोहकपने डोलणाऱ्या वृक्षमाळा केवळ असमर्णीय ठरतात. ही शिल्पे चालुक्यांचे कला वैभव गात आजही उभे आहेत.[15]

### नायगावचा मयूर अभयारण्य :-

बीड शहरापासून 25 कि.मी. अंतरावर पश्चिमेला असलेल्या नायगाव या गावाचया परिसरात हे अभयारण्य आहे. 1994 साली शासनाने या अभयारण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण भारतातील पहिले मयूर अभयारण्य म्हणुन नायगावला महत्त्व प्राप्त झाले आहे. या मयूर अभयारण्यात 10 ते 12 हजारांचया दरम्यान मोरांची संख्या आहे. त्याच बरोबर तरस लांडगे कोल्हे सायाळ, खोकड, रासनससे, रान मांजर काळवीट, हरिण, मूंगुस इत्यादी प्राणी देखील आहेत. या अभयारण्यातून साधारण 40 कि.मी. अंतरावर निसर्गरम्य असा सौताडा धबधबा आहे. समाधानकारक पाऊस झालेला असेल तर जुलै व सप्टेंबर या कालावधीत मनमोहक धबधबा या ठिकाणी पाहवयास मिळतो.[16]

### सारांश :-

मराठवाड्यातील प्राचीन मध्ययुगीन ऐतेहासीक व धार्मीक संस्कृतीक दृष्ट्या प्रसिध्द व पर्यकटकांना आकषीत करणारा महत्त्वपूर्ण जिल्हा म्हणजेच बीड जिल्हा होय. या बीड जिल्ह्यात अंबाजोगाई , गेवराई, धारुर, धर्मापूरे हे ऐतेहासीक ठेवा खुप प्रमाणात उपलब्ध झालेला आहे. वास्तविक पाहता या जिल्ह्याच्या दक्षिणेला शालीवाहन कालीन प्रसिध्द नगरी तेर, उत्तरेला शालीवाहन राजधानी पैठण, पश्चिमेला बहमणीकालीन राजधानी अहमदनगर या सारखी ऐतेहासीकनगरी असताना सुध्दा मराठवाड्यातील बीड शहराला प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा वारसा लाभलेला आहे.

### संदर्भ ग्रंथ


1) सांज दैनिक भुकंप — संपादक अशोक चिंचोले, 28 सप्टेंबर 2015, पृ.क्र. 02

2) बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास — सतीश साळुके, प्रकाशक सतीश साळुंके, प्रथम आवृत्ती. 23 फेब्रुवारी 2011, पृ.क्र. 203,207

3) सांज दैनिक भुकंप — संपादक अशोक चिंचोले, 28 सप्टेंबर 2015, पृ.क्र. 02

4) बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास — सतीश साळुके, प्रकाशक सतीश साळुंके, प्रथम आवृत्ती. 23 फेब्रुवारी 2011, पृ.क्र. 226,227

5) कित्ता -पृ.क्र. 227,228

6) कित्ता पृ.क्र. 228

7) बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास - सतीश साळुके, प्रकाशक सतीश साळुंके, प्रथम आवृत्ती. 23 फेब्रुवारी 2011, पृ.क्र. 188

8) सांज दैनिक भुकंप — संपादक अशोक चिंचोले, 28 सप्टेंबर 2015

पृ.क्र. 02

9) बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास - सतीश साळुके<br>प्रकाशक सतीश साळुंके<br>प्रथम आवृत्ती.<br>23 फेब्रुवारी 2011<br>पृ.क्र. 189,190

10) कित्ता - पृ.क्र. 191

11) सांज दैनिक भुकंप संपादक अशोक चिंचोले<br>28 सप्टेंबर 2015<br>पृ.क्र. 02

12) बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास - सतीश साळुके<br>प्रकाशक सतीश साळुंके<br>प्रथम आवृत्ती.<br>23 फेब्रुवारी 2011<br>पृ.क्र. 80

13) सांज दैनिक भुकंप संपादक अशोक चिंचोले<br>28 सप्टेंबर 2015<br>पृ.क्र. 02

14) बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास - सतीश साळुके<br>प्रकाशक सतीश साळुंके<br>प्रथम आवृत्ती.<br>23 फेब्रुवारी 2011<br>पृ.क्र. 143,144,147

15) बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास - सतीश साळुके<br>प्रकाशक सतीश साळुंके<br>प्रथम आवृत्ती.<br>23 फेब्रुवारी 2011<br>पृ.क्र. 151,152

16) सांज दैनिक भुकंप संपादक अशोक चिंचोले<br>28 सप्टेंबर 2015<br>पृ.क्र. 02

17) बीड जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास - सतीश साळुके<br>प्रकाशक सतीश साळुंके<br>प्रथम आवृत्ती.<br>23 फेब्रुवारी 2011

18) प्राचीन शिव आणि जैन मंदीर - अनील कठारे, गजाणन पाटील

19) महाराष्ट्रातील कांही ताम्रपट व शिलालेख - मा.ग. दिक्षित

20) महाराष्ट्रातील बारव स्थापत्य - अरुणचंद्र पाठक

21) सात वाहन कालीन महाराष्ट्र - रा. श्री. मोरवंचीकर

22) दक्षिण मध्ययुगीन इतिहासाची साधने - प्रा.ग.ह. खरे खंड 02

23) मुसलमानी रियासत - गोविंद सखाराम देसाई

24) प्राचीन आणि मध्ययुगीन भारतातचा ईतिहास - एस.एम.रोडे ,बी.डी. कुलकर्णी

25) आधुनिक जगाची संस्कृती आणि इतिहास - जयसिंगराव पवार

26) भारत का इतिहास - रोमीला थापर

27) मराठवाड्याचा ईतिहास - सोमनाथ रोडे

28) मराठवाड्याचे कला वैभव - म.श्री. माटे
29) बहमणी राज्याचा इतिहास - भ.ग.कुंटे
30) मराठवाडा काल आणि आज - काळे भगवान
31) मराठवाड्याचा इतिहास - पी.व्ही. काटे
32) मराठवाड्यातील किल्ले - अनिल कठारे शिवाजीपवार
33) मराठवाड्यातील मंदिरे आणि शिल्पे - गो.ब. देगलुरकर